दैनिक साहसिक
बुधवार १९ जुलै २०२३

# शहरात भुरट्या चोरींचे घटनात वाढ, पोलिसांचे दुर्लक्ष




**साहसिक वृत्त / १८ जुलै**

**हिंगणघाट:** शहरात आता अमली पदार्थ तसेच अवैध दारू विक्री बिनभोभाट सुरू असून मोबाईल चोरी तसेच मोटर सायकल तसेच सायकल चोरींच्या घटनांमध्ये मोठी वाढ झालेली दिसून येत आहे. शहरातील प्रतिष्ठित नागरिक तथा विदर्भ विकास आघाडीचे नेते अनिल जवादे यांचे निवासस्थानाचे कंपाउंड मधून दोन सायकली चोरट्यांनी लंपास केल्या. सदर प्रकरणी अनिल जवादे यांनी शहर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली, चोरट्याची ही चोरी सीसीटीव्ही मध्ये कैद झाली, दिनांक एक जुलै रोजी त्यांच्या दोन सायकली चोरट्याने चोरी करण्यात आल्याचे सीसीटीव्ही फुटेज सुद्धा पोलिसाना देण्यात आले, सदर चोरटा सायकलचोरी करताना स्पष्टपणे दिसत असतांनाही पोलिसांनी आजपर्यंत या चोरट्याचा छडा लावला नाही. श्रीयुत जवादे यांचे या सायकल चोरीमध्ये एकूण २२ हजार रुपयाचे नुकसान झाले आहे. आठवडी बाजारातून दर सोमवारी बाजारात खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांचे मोबाईल चोरी होत असल्याच्या अनेक घटना उघडकीस आले आहे.स्थानिक लक्ष्मी टॉकीज परिसरातील निवासस्थानावरून एका स्कूटरची चोरी करण्यात आली, परंतु त्याचाही शोध घेण्यास पोलीस अपयशी ठरलेले आहेत.

# सर्वसामान्य नागरिकांना विहीत कालावधीत सेवा द्या-अभय यावलकर

## लोकसेवा हक्क आयुक्तांचा विभाग प्रमुखांशी संवाद



**साहसिक वृत्त / १७ जुलै**

**वर्धा :** सर्वसामान्य नागरिकांना वेळेत आणि पारदर्शकपणे सेवा उपलब्ध होण्यासाठी लोकसेवा हमी कायदा अस्तित्वात आला आहे. त्यामुळे विभाग प्रमुखांनी आपल्या अधिनस्त सेवा लाभार्थ्यांना वेळेत मिळतात का याची वेळोवेळी तपासणी केली पाहिजे. त्यासाठी कार्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांचा वेळोवेळी आढावा घेतला जावा, असे नागपुर विभागाचे राज्य लोकसेवा हक्क आयुक्त अभय यावलकर यांनी सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयुक्तांनी विभाग प्रमुख अधिकाऱ्यांशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीला जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, निवासी उपजिल्हाधिकारी अर्चना मोरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, उपजिल्हाधिकारी प्रियांका पवार, समाजकल्याणचे सहाय्यक आयुक्त प्रसाद कुळकर्णी, आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी दिपक हेडाऊ, कार्यकारी अभियंता श्री. वाघ, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी प्रभाकर शिवणकर, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख प्रमोद ठुबे याच्यासह विभाग प्रमुख अधिकारी उपस्थित होते. सुरुवातीस जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सेवा हमी कायद्यांतर्गत जिल्ह्यात सुरु असलेल्या कामाची माहिती दिली. नागरिकांना घरपोच सेवा देण्यासाठी सेवादूत प्रकल्प सुरु करण्यात आला आहे. तालुकास्तरावरील सेतू केंद्र महिला बतचगटांना चालविण्यास देण्यात आले असून तालुकास्तरीय कार्यालये ई-ऑफिसने जोडली असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी बैठकीत सांगितले.सर्वसामान्य नागरिकांना विहीत कालावधीत किंवा त्यापुर्वी सेवा उपलब्ध करून दिली पाहिजे. या कामाचे सनियंत्रण स्वत: विभाग प्रमुख अधिकाऱ्यांनी करावे. सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी सुरु करण्यात आलेल्या योजनांची माहिती विभागांनी लाभार्थ्यांपर्यंत कशी जाईल यासाठी विशेष जनजागृती करावी. सेवा हमी कायद्यांतर्गत चांगले काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना शासनाच्यावतीने गौरविण्यात येणार असल्याचे श्री.यावलकर यांनी सांगितले.

पगार देऊन सर्वसामान्य नागरिकांची सेवा करण्याची संधी शासनाने आपणास दिली आहे. याची जाणीव काम करतांना असणे आवश्यक आहे. सर्वसामान्य गरजू, गरीब लाभार्थी आपल्याकडे येत असतात. त्यांना वेळेत आणि कमी त्रासात सेवा देण्याचा आपला दृष्टीकोण असला पाहिजे. कार्यालयात येणाऱ्या लाभार्थ्यांना सौजन्याची वागणूक दिली जावी, असे ते म्हणाले. कर्मचाऱ्यांची वैद्यकीय देयके, कालबद्ध पदोन्नती, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची पेंशन या गोष्टी वेळेत दिल्या गेल्या पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

**आयुक्तांकडून जिल्ह्याच्या कामाचे कौतूक**

वर्धा जिल्हा प्रशासनाने नागरिकांना थेट घरी सेवा देणारी 'सेवादूत' नावाची प्रणाली सुरु केली. या प्रणालीचे यापुर्वीच राज्यस्तरावर कौतूक करण्यात आले आहे. याशिवाय तालुकास्तरावरील सेतू केंद्र महिला बचत गटांद्वारे चालविण्यात येत आहे. तालुकास्तरावर शासकीय कामकाजाला गती देण्यासाठी सर्व तालुक्यात ई-ऑफिस ही प्रणाली कार्यान्वित करण्यात आली. जिल्ह्याच्या या कामाचे राज्य लोकसेवा हक्क आयुक्त अभय यावलकर यांनी बैठकीत कौतूक केले.

# दहेगांव-देवळी-वायगांव-कोसुर्ला राज्यमहामार्ग आशियायी विकास बँक योजनेतुन विकसीत होणा; खासदार रामदास तडस यांच्या प्रयत्नाला यश

* **दहेगांव-देवळी-वायगांव-कोसुर्ला एकुण ४३ किमी लांबी होणार विकसीत.**
* **आष्टी व कारंजा दोन तालुक्यातील महामार्गाचा आशियायी विकास बँक योजनेत समावेश.**
* **सवीस्तर प्रकल्प अहवाल (DPR) निर्मीतीचे कार्य प्रगतीपथावर**



**साहसिक वृत्त / १८ जुलै**

**वर्धा :** वर्धा जिल्हयातील राज्य महामार्गाची अत्यंत महत्वपुर्ण लांबी ही अनेक वर्षापासून अविकसीत होती, अश्या दहेगांव-देवळी-वायगांव-कोसुर्ला या राज्यमहामार्गाचे एकुण ४३ किमी लांबीचा व सोबतच कारंजा व आष्टी तालुक्यातील मोशी-आष्टी-थार-पार्डी या राज्यमहामार्गाचा आशियायी विकास बँक (ADB) योजनेतुन विकसीत करण्याकरिता समावेश करण्यात आला असुन महाराष्ट्र शासनाच्या वतीने सदर कामांच्या सवीस्तर प्रकल्प अहवाल निर्मीतीकरिता प्रशासकीय स्तरावरून कार्यवाही सुरू झाल्याची महत्वपुर्ण माहिती वर्धा लोकसभा मतदार संघाचे लोकप्रीय खासदार रामदास तडस यांनी दिली.

दहेगांव-देवळी-वायगांव-कोसुर्ला या राज्यमहामार्गाचे नियत्रंण महाराष्ट्र शासनाकडे आहे. हा रस्ता नादुरूस्त असल्याने अनेकांना फेरा मारून वर्धा मार्गे प्रवास करावा लागत होता. ही बाब लक्षात घेऊन २०२२ मध्ये सत्तांतर झाल्यानंतर खासदार रामदास तडस यांनी या रस्त्याचा विकास करण्याकरिता सतत पाठपुरावा सुरू केला. उपमुख्यमंत्री श्री. देवेन्द्रजी फडणवीस, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री श्री. रवींद्रजी चव्हाण यांची वेळोवेळी भेट घेऊन हा प्रश्न रेटुन धरला, परिणामी महाराष्ट्र राज्यात आशियायी विकास बँकेने १००० किमी च्या विकासाकारिता मंजुरी प्रदान केली. यामध्ये प्रामुख्याने दहेगांव-देवळी-वायगांव-कोसुर्ला तसेच मोशी-

(उर्वरित पान २ वर)

# नागपूर महापालिकेत कंत्राटी शिक्षक पदभरती रद्द करावी-अँड.राहुल झांबरे यांची मागणी



**साहसिक वृत्त / १८ जुलै**

**नागपूर:** महापालिकेने दिनांक १३ जुलै २०२३ ला वर्तमान पत्रात जाहिरात देत माध्यमिक शाळा आणि उच्च माध्यमिक शाळेकरिता कंत्राटी शिक्षक भरती करिता माध्यमनिहाय व विषयनिहाय अनुक्रमे ६३ आणि २० पदांची जाहिरात प्रत्यक्ष मुलाखती द्वारे घेण्यासाठी काढली होती. ज्यामध्ये सर्व कंत्राटी शिक्षकांना सरसकट २५ हजार रुपये ११ महिन्याचा तात्पुरत्या स्वरूपात देण्याचे सांगण्यात आले आहे...मात्र या जाहिराती मध्ये अनेक त्रुटी असून यामध्ये मोठा घोळ झाल्याचे दिसून येत आहे. कारण राज्य शासनाचा शालेय शिक्षण विभाग व क्रीडा विभागाने ३० जून २०१६ ला उें काढीत राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनाचा सर्व प्राथमिक शिक्षकांसाठी ( वर्ग १ ते ८ ) शिक्षक पात्रता परीक्षा ( ऊॅं ) अनिवार्य केली आहे..तसेच ८ ते १० आणि ११ ते १२ वर्गासाठीही ऊॅं आणि ऊॅंघ्ऊ ही परीक्षा बंधनकारक केली आहे... असे असतांना नागपुर महापालिकेने दिलेल्या जाहिराती मध्ये अश्या कुठल्याही पात्रता परीक्षेचे निकष लावण्यात आले नाही.. ही सर्वात मोठी गंभीरबाब आहे. याशिवाय महापालिकेत शिक्षण घेणाऱ्या हजारो गरीब होतकरू मुलांवर मोठा अन्याय असल्याचा आरोप नागपुरातील सामाजिक कार्यकर्ते अँड. राहुल झांबरे यांनी केला आहे तसेच जाहिराती मध्ये माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळेचा उल्लेख करण्यात आला आहे.. मात्र सविस्तर जाहिराती मध्ये कनिष्ठ महाविद्यालयाचा कुठलाही उल्लेख करण्यात आलेला नाही.. जे शिक्षक उमेदवारांना दिशाभूल करणारा आहे.. तसेच हे पदे महापालिकेत आकृतीबंध

(उर्वरित पान २ वर)

# हेल्प लिंक फाउंडेशन नागपूर तर्फे मूकबधिर विद्यार्थ्यांना गणवेश व दफ्तर वितरण

**साहसिक वृत्त / १८ जुलै**

**वर्धा :** हेल्प लिंक चॅरिटेबल फाउंडेशन नागपूर व भारतीय जैन संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने राजीव गांधी निवासी मूकबधिर विद्यालय पुलगाव येथील गरजू दिव्यांग विद्यार्थ्यांना गणवेश व दफ्तरचा वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाला श्री. अभिषेक बैद, जिल्हाध्यक्ष वर्धा, श्री. नितीन सिंधी, शहर अध्यक्ष, श्री. संदेश बोथरा, श्री. पप्पूजी सेठीया, श्री. जयेश जयस्वाल, दानशूर समाजसेवक श्री.



वरूनबाबु दफ्तरी तसेच श्री. अनुज शाह मान्यवरांचे विद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले. शाळाप्रमुख श्री. महेंद्र जाधव यांनी प्रास्ताविक करून शाळा व संस्थेविषयी माहिती दिली.

श्री. अभिषेक बैद यांनी आपले विचार व्यक्त करुन विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

मान्यवरांचे हस्ते विद्यार्थ्यांना गणवेश व दफ्तराचे वितरण करून खाऊचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन अजय वानखडे व आभार प्रदर्शन प्रशांत नासरे यांनी केले. कार्यक्रमाला शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच पालक उपस्थित होते.

# शेतकरी उत्पादक संघ व कंपन्यांना गोदाम बांधकामासाठी अनुदान

**साहसिक वृत्त / १८ जुलै**

**वर्धा :** राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान कडधान्य योजनेंतर्गत जिल्ह्यात अनुदानावर गोदामे बांधण्यात येणार असून त्यासाठी शेतकरी उत्पादक संघ व कंपन्यांकडून अर्ज मागविण्यात आले आहे.जिल्ह्याला कमाल २५० मेट्रीक टन गोदाम बांधकाम दोनचे भौतिक उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. प्रत्यक्ष झालेल्या बांधकामाच्या ५० टक्के किंवा १२ लाख ५० हजार रुपये यापैकी जे कमी असेल अशा प्रकल्पाकरीता शेतकरी उत्पादक संघ व कंपन्यांना गोदाम बांधकामाकरीता अनुदान देण्यात येणार आहे. यासाठी २५ जुलै पर्यंत संबंधित तालुका कृषि कार्यालयास प्रस्ताव सादर करावयाचा आहे.सदर बाब बँक कर्जाशी निगडीत असल्यामुळे अर्जदारांनी प्रस्ताव सादर करतांना केंद्र शासनाच्या ग्रामीण भंडारण योजना, नाबार्डच्या मार्गदर्शक सुचनांनुसार बँकेकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. बँकेने सदर प्रकल्प मंजुर केल्यानंतरच संबंधित अर्जदारास अनुदान देण्यात येईल. यासाठी इच्छुक लाभार्थ्यांनी अर्ज महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांकडून अथवा सार्वजनिक विभागाच्या मान्यताप्राप्त डिझाईन्स, स्पेसीफिकेशन व खर्चाच्या अंदाजपत्रकासह गोदाम बांधकामाचा प्रस्ताव सादर करणे आवश्यक राहील.

# वनपट्टे धारक शेतकऱ्यांसाठी विहिर, सोलरपंप योजना अनुसुचित जमातीच्या लाभार्थ्यांना अर्ज करण्याचे आवाहन

**साहसिक वृत्त / १८ जुलै**

**वर्धा :** अनुसुचित जमातीच्या वनपट्टे प्राप्त असणाऱ्या लाभार्थ्यांना शेतीला पाणी पुरवठा करण्याकरीता विहिरीची निर्मिती करणे, शेतीत सोलरपंप बसवून त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी योजना सुरु करण्यात आली आहे. यासाठी अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांनी अर्ज सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत विशेष केंद्रीय सहाय्य योजनेंतर्गत जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या वनहक्क कायदा २००६ अंतर्गत वनपट्टे प्राप्त असणाऱ्या अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना शेतीला पाणी पुरवठा करण्याकरीता सदर योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक लाभार्थ्यांनी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातुन अर्ज प्राप्त करुन आवश्यक कागदपत्रासह जुलैअखेर पर्यंत सादर करावे,

योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी अनुसूचित जमातीचा असावा. त्याच्याकडे सक्षम अधिकाऱ्यांचे जात प्रमाणपत्र असावे, अर्जसोबत रहिवासी दाखला, वनहक्क कायद्याद्वारे वनपट्टा प्राप्त झाल्याचे प्रमाणपत्र, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक प्रथम पानाची सत्यप्रत, सातबारा, ८-अ चा उतारा, तहसिलदारांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला, विहिर प्रस्तावित असलेल्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता असल्याचे भुजल सर्व्हेक्षण यंत्रणेचे प्रमाणपत्र, किमान जमिन क्षेत्र, सदर योजनेचा लाभ यापुर्वी आदिवासी विकास विभाग अथवा इतर कोणत्याही शासकीय विभागाकडून घेतला नसल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे, असे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी दिपक हेडाऊ यांनी कळविले आहे.

# एक रुपया मध्ये पीक विमा रजिस्ट्रेशन साठी गावा गावात जनजागृती

## ग्रामपंचायत सदस्य वडनेर गुरूदयालसिंग जुनी यांच्या स्वखर्चाने शेतकऱ्यांना माहिती देण्यात आली



**साहसिक वृत्त / १८ जुलै**

**हिंगणघाट:** तालुक्यातील वडनेर सर्कल मधून सगळ्या शेतकऱ्यांना भावांना सुचित करण्यात येत आहे की शासना कडून एक रुपये पिक विमा निघत आहे ,तर सर्व शेतकरी भावांना माझी कळकळीची विनंती की सर्वांनी आपले शेताचे मालाचे विमा वडनेर बस स्टॉप येथे ग्राहक सेवा केंद्र माननीय श्री रितेशभाऊ उमरे यांच्याकडे ऑनलाइन रजिस्ट्रेशन करून मिळेल सर्व शेतकरी बंधू यांनी करून घ्यावं त्यासाठी गुरुदयालसिंग जुनी ग्रामपंचायत सदस्य वडनेर याच्याकडून सर्व वडनेर सर्कलच्या गावभर शेतकऱ्यांना माहितीसाठी गाडीची सेवा उपलब्ध करून दिली आहे व मा श्री प्रफुल भाऊ देवतळे,मा श्री दिनेश भाऊ चंदनखेडे, माननीय श्री नानाभाऊ माणिकपुरे, माननीय श्री प्रशांत भाऊ दरोडे, हे उपस्थित होते ज्या ज्या गावात ले लोकांना व शेतकऱ्यांना जागृत करण्यात आले ज्या गावात गाडी प्रचारित केले वडणेर, दारोडा, मानकापूर, फुकटा, येरणगाव ,आजनसरा कानोली, कात्री, सोनेगाव राऊत,मनसावली, निदा टाकळी , येरनगाव ,इत्यादी गावातील शेतकऱ्यांना पिक विमा साठी शासनाकडून १ रुपये मध्ये मिळत आहे वडनेर बस स्टॉप येथे ऑनलाइन रजिस्टर करण्यासाठी रितेश भाऊ उमरे व आपली सरकार जिथे असेल तिथे ऑनलाईन रजिस्ट्रेशन सर्व शेतकऱ्या भावांना करून घेणे आहे गुरुदयाल सिंग जुनी ग्रामपंचायत सदस्य यांनी सै खर्चाने ही सेवा शेतकऱ्या भावासाठी जग जागृती करण्यासाठी केलेले आहे.

राकेश माणिकपुरे डेकोरेशन वडणेर येथील यानि ही माहिती गावा गावा मध्ये टाटा एस स्व खर्चातून गावागावात जनजागृती पोहचवली ,शेतकऱ्यांना काही गोष्टी माहिती न मिळाल्याने शेतकऱ्यांन पर्यंत पीक विमा कमी कमी फिस मध्ये रजिस्ट्रेशन करावी,या वडणेर येथे शेतकऱ्यांनि येऊन १८ तारखीला ला येऊन रजिस्टर वडनेर येथे सुरू होणार आहे मित्रमंडळी तर सगळ्या शेतकऱ्यांना जास्ती जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवहान करण्यात आले.

# भूदान यज्ञ मंडळाची शेतजमीन पारव्यातील दोघांना वितरित

## लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे चौकशी मागणी

**साहसिक वृत्त / १८ जुलै**

**घाटंजी :** भूदान यज्ञ मंडळ यवतमाळ-नागपूर, भूदान यज्ञ मंडळाचा एकच पट्टा घाटंजी तालुक्यातील पारवा येथील दोघांना वाटप केले. यामुळे नवा वाद उपस्थित होउन सदर प्रकरण यवतमाळच्या दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) डी. एप. थोरात यांच्या न्यायालयात पोहोचला आहे. या प्रकरणाची चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

सदर प्रकरणात वादी नामदेव बापु सपाटे यांनी प्रतिवादी म्हणून. महाराष्ट्र शासनातर्फे जिल्हाधिकारी यवतमाळ तहसीलदार घाटंजी भुदान यज्ञ मंडळाचे सचिव एकनाथ डगवार भुदान यज्ञ मंडळाचे अध्यक्ष व आकाश सुभाष ठमके विरुद्ध दावा दाखल केला. घोषणेच्या कायम मनाई हुकमाचा व मॅन्डेटरी मनाई हुकुमाकरिता दावा दाखल करण्यात आला आहे. घाटंजीचे तत्कालीन तहसीलदार यांनी पारवा येथील नामदेव सपाटे यांच्या नावाने ११ फेब्रुवारी १९६८ रोजी भुदान पट्टा ३३० भुदान यज्ञ विदर्भ विभाग नागपूरचे मंत्री पी. जी. शेदुर्णीकर यांच्या सहीनिशी देण्यात आला होता. सदर पट्यानुसार पारवा येथील गट नंबर ८१ जुना सर्वे नंबर २०१/२ क्षेत्रफळ १ हेक्टर २८ आर ही शेतजमीन वादी नामदेव सपाटे यांच्या ताब्यात व वहीतीत असताना भुदान यज्ञ मंडळाचे सचिव एकनाथ डगवार व इतरांनी मोठी उलाढाल करून लाखो रुपये घेऊन तिच गट नंबर ८१ ही शेतजमीन भुदान पट्टा ३० जुलै २०२२ रोजी पारवा येथील प्रतिवादी आकाश ठमके यांनी चुकीच्या मार्गाने बेकायदेशीर पुन्हा देण्यात आला त्या नुसार १० डिसेंबर २०२२ रोजी भुदान यज्ञ मंडळाचे सचिव एकनाथ डगवार व इतरांनी तहसीलदार घाटंजी यांना तसे पत्र दिले. त्या आधारे शेताच्या महसूली दप्तर ८७४ क्रमांकाचा फेरफार नोंदविण्यात आला तसेच प्रतिवादी आकाश ठमके यांच्या नावाने सदर शेतजमीनीची नोंद करण्यात आली. वास्तविक पाहता एकदा दिलेला पट्टा दुसऱ्याला नियमानुसार देता येत नाही परंतु भुदान पट्टाच्या नावाखाली लाखो रुपये घेऊन नियमबाह्य पट्टे देणे सुरू आहे. विशेष म्हणजे भुदान यज्ञ मंडळाचे सचिव एकनाथ डगवार हे मध्यंतरीच्या काळात सचिव पदावर नासताना नियमबाह्य भुदान पट्टे वाटप करुन शासनाची दिशाभूल करुन फसवणूक केली आहे. तसेच सचिव पदावरील वाद सदर स्थगिती प्रकरण उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात प्रलंबित आहे. त्यामुळे सदर प्रकरणात जिल्हाधिकारी यवतमाळ तहसीलदार घाटंजी यांना प्रतिवादी करण्यात आले. पारवा येथील खंड १ मधिल गट नंबर ८१ जुना सर्वे नंबर २०१/२ मधिल एक हेक्टर २८ आर भोगवटवर्ग दोन प्रतिवादी आकाश ठमके याचा भुदान पट्टा रद्द करुन जिल्हाधिकारी यवतमाळ तहसीलदार घाटंजी भुदान यज्ञ मंडळाचे सचिव एकनाथ डगवार प्रतिवादी आकाश ठमके यांच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची मागणी वादी नामदेव सपाटे यांनी यवतमाळच्या दिवाणी न्यायालयात केली आहे.

दै.साहसिक हे वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक रवींद्र नरहरिपंत कोटंबकार,मुद्रक-निरज त्रिपाठी यांनी जनसंग्राम ऑफसेट प्रिंटर्स, आर.टी.रोड गोंडप्लॉट वर्धा येथे मुद्रित करून दै.साहसिक कार्यालय, राधे कॉम्प्लेक्स, अकोला अर्बन बँकेच्यावर, सोशालिस्ट चौक, वर्धा येथे प्रकाशित केले.
दूरध्वनी: (07152) 242498, dsahasik@gmail.com RNI NO. MAHMAR / 2007 / 24829 - Postage- WDA / 42 / 08 -10 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.(कुठलाही वाद वर्धा न्यायालयांतर्गत बाध्य राहील.)